नियमित दिवाणी मुकदमा क्र. ५६/१९९३
नि. १५० लगत

शपथेवर सुरू

पुढील उलटतपास प्रतिवादी क्र. १, २, ५ ते ७, ११, १३, १४ व १६ तर्फे वकील श्री. एस.जी.पणदुरकर यांचेतर्फे

२६ माझ्या शपथपत्रातील परि. क्र. ४ मध्ये मी स.क्र. ३२१ चे जे एकूण क्षेत्र दिले त्यातील मी पोट हिश्श्यांचे दिलेल्या क्षेत्राची बेरीज करता एकूण क्षेत्रातून उर्वरित राहिलेली मिळकत म्हणजेच १ हेक्टर २० आर. याचे काय झाले याबाबत मला काही माहिती नाही. त्या मिळकतीचा सातबाराचा उतारा मी पाहिलेला आहे परंतु त्याबाबत मला आता काहीही सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींनी एकूण ७७ गुंठे जमीन विकत घेतलेली आहे व ती त्यांच्या नावावर आहे. स.क्र. ३२१चे अ,ब व क असे तीन भाग झाले याबाबत माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. साक्षीदाराला आता भूमी अभिलेख यांच्या कार्यालयातील गटबुक नकाशा दाखविला. त्या नकाशास **नि. २४२** दिली आहे. त्या नकाशाप्रमाणे परिस्थिती आहे की नाही हे मला आता सांगता येणार नाही. दाव्यासोबत दिलेल्या नकाशातील अ.क्र. ४ ची टिप ही चुकीची आहे असे माझे म्हणणे आहे.

२७. अशोक सावंत यास खरेदीखताच्यावेळी कोणी आणले हे मला आता आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ३ ची पत्नी दिपाली दिलीप वैज व मुलगी दिव्या दिलीप वैज हे स. क्र. ३२१ हि.क्र. १अ मधील त्यांच्या मिळकतीत रहातात. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींचे खरेदीखत मी अथवा वाळके यांनी रद्द करून घेतलेले नाही. दावा मिळकतीचे तीन भाग झाले याबाबतचे निस सध्या जागेवर आहेत की नाही हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रातील परि.क्र ३ व ४ मधील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींचा व माझा कोणताही संबंध नसताना मी व वाळके यांनी प्रतिवादींना त्रास देण्यासाठी त्यांच्याविरूध्द खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीसंबंधी दावा प्रलंबित आहे याची मलामाहिती असताना मी ती मिळक्त विकत घेतली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे पुराव्याचे शपथपत्र दाखल करून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास प्रतिवादी क्र. ४ करीता वकील श्री. सी.ए.आकेरकर यांच्यातर्फे

२८. जुना स.क्र. ३२१ हि.क्र. १ चा पोट क्रमांक व फाळणी क्रमांक किती हे मला सांगता येणार नाही. मी स.क्र. ३२१ चा पोट व फाळणीचा नकाशा पाहिलेला आहे. दावा मिळकतीचा पूर्वीचा क्रमांक स.क्र ३२१ पोट क्र. ० फाळणी क्र. १ असा होता हे दाखवण्यासाठी माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीचे पूर्वीचे वर्णन स.क्र. ३२१ पोट क्र. ० फाळणी क्र. १ असे होते हे मी खोटे सांगतो. वाळके यांनी दावा मिळकत क्षेत्र २८ गुंठे विकत घेतली हे दाखवण्यासाठी माझ्याकडे कोणताही पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, पूर्ण २८ गुंठे क्षेत्रावर वाळके यांना कोणताही हक्क व अधिकार मिळालेला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, संपूर्ण दावा मिळकतीवर माझा कोणताही हक्क व अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

नियमित दिवाणी मुकदमा क्र. ५६/१९९३

नि. १५० लगत

प्रतिवादी क्र. १, २, ५ ते ७, ११, १३, १४ व १६ यांचा उलटतपास उर्वरित उलटतपास म्हणून स्विकारला.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत.

सही/—

(एम्.एस्.बुधवंत )

दिनांक :— १९/०६/२०१७. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सावंतवाडी.